# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

## पाणी पुरवठा जायकवाडी यांत्रिकी विभाग

फोन क्र. ०२४०-२३३३५३६ ते ४०, २३३१३१५ फॅक्स क्र. ०२४०-२३३१२१३


जा.क्र./मनपा/काअ/पापु/जायां/२०२४/१३५ दिनांक : २४/०७/२०२४

## दरपत्रक सुचना

**विषय :** छत्रपती संभाजीनगर शहर पाणी पुरवठा योजनेवरील भंगार साहित्याच्या लिलाव करण्यासाठी असलेल्या माल/साहित्यांचे मुल्य ठरविण्यासाठी मुल्यांकनकर्त्याची (Valuer) नियुक्ती करणे बाबत.

उपरोक्त विषयान्वये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या जायकवाडी व शहर पाणी पुरवठा योजनेवरील असलेले विविध पंपगृह येथील भंगार साहित्याचा लिलाव करण्सास मा.आयुक्त तथा प्रशासक महोदय यांची दिनांक २५/०७/२०२३ रोजी मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुषंगाने विभागांतर्गत असलेल्या विविध पंपगृह येथील दि.२३/०७/२०२४ रोजी अखेरच्या शिल्लक एकत्रित भंगार माल/साहित्यांचे मुल्यांकन करावायासाठी मुल्यांकनकर्त्याची (Valuer) नियुक्ती करणे आहे. करीता खालीलप्रमाणेच्या अटी व शर्तीनुसार पात्र इच्छुक मुल्यांकनकर्ता (Valuer) यांनी आपले दरपत्रक (Quotation) सर्व आवश्यक त्या कागदपत्रांसह **कार्यालय कार्यकारी अभियंता (यां.), पाणी पुरवठा जायकवाडी यांत्रिकी विभाग, टप्पा क्र.३ ईमारत, तिसरा मजला, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका** या ठिकाणी बंद लिफाफ्यात प्रत्यक्ष किंवा पोस्टाने दिनांक ३१/०७/२०२४ रोजी ०२ वाजेपर्यंत सादर करावेत. यानंतर आलेले दरपत्रक (Quotation) विचारात घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

***अटी व शर्ती***

१) मूल्यांकन कर्ता सनदी अभियंता असणे आवश्यक आहे.

२) चार्टड इंजिनिअर सर्टिफिकेट म्हणजे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

३) मूल्यांकन कर्ता आयकर खात्याच्या नियम ३४ अ ब अन्वये नोंदणीकृत सरकारी मूल्यांकन कर्ता (रजिस्टर गव्हर्नमेंट व्हॅल्यूअर) असणे आवश्यक, प्रमाणपत्र जोडावे.

४) सदर सरकारी मूल्यांकनकर्ता यांना या व्यवसायात किमान दहा वर्ष अनुभव असणे आवश्यक आहे.

५) सदरील सरकारी मूल्यांकनकर्ता विमा नियामक विकास प्राधिकरण म्हणजे इन्शुरन्स रेग्युलेटरी अँड डेव्हलपमेंट अॅथॉरिटी सर्वेक्षक अथवा सर्वेअर असल्यास प्राधान्य.

६) निरस्त निरुपयोगी व भंगारमालाचे मूल्यांकन केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

७) मुल्यांकनकर्ता यांनी गत पाच आर्थिक वर्षात महाराष्ट्रातील महानगरपालिकेच्या मालाच्या लिलावासाठीचे मूल्यांकन केलेले असणे आवश्यक आहे. याबाबत दरपत्रकासोबत सदरील कामाचे कार्यादेश जोडणे आवश्यक आहे.

८) राष्ट्रीय स्तरावरील कोणत्याही मूल्यांकन संस्थेचा जसे की इन्स्टिट्यूशन ऑफ व्हॅल्यूअर्स (नवी दिल्ली) चे आजीव सभासद असणे आवश्यक आहे.

९) गेल्या दहा वर्षात मूल्यांकन कर्त्यावर कोणत्याही प्रकारचा मूल्यांकनाशी निगडित दावा, गुन्हा दाखल नसल्याचे मूल्यांकन कर्त्याचे हमीपत्र आवश्यक आहे.

१०) गेल्या तीन वर्षात निरस्त निरुपयोगी किंवा भंगार मालाचे वाजवी व योग्य मूल्यांकन केले असल्याचे कोणत्याही शासकीय सरकारी व महानगरपालिकेची संबंधित कार्यालयाचे पत्र जोडणे आवश्यक आहे

अधिक माहितीसाठी संपर्क : ९०४९१७५७०९/९७६४९९९६६४ (श्री.सचिन वाईकर), ९१५८९०००५३ (श्री.उदय मानवतकर), ९१५८१८२९६१ (श्री.केशव बोंडे).

**कार्यकारी अभियंता (यां.)**
**पाणी पुरवठा जायकवाडी**
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका